## जिल्हा परिषद,जळगाव अंतर्गत गट क पदभरती २०१९-२०२०

शुध्दीपत्रक क्र.२ दि. ०३/०१/२०२०

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतच्या शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ नुसार तसेच शासन निर्णय दिनांक २४/१२/२०१९ चे मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा निवड समिती,जळगाव कडिल जाहिरात क्र.२/२०२० दैनिक लोकमत जाहिरात प्रसिध्द दि.३/१/२०२० व दैनिक दिव्यमराठी जाहिरात प्रसिध्द दिनांक ३/१/२०२० या वृत्तपत्रात अनुसूचीत जमातीच्या राखीव जागांवर नियुक्त कर्मचा-यांची पदे अधिसंख्य करून पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तथापी सदर जाहिरातीत **अ.क्र.१६ सामाजिक व समांतर आक्षणाचे अनुषंगाने महत्वाच्या सूचना यातील बाब क्र.१ दिव्यांग (विकलांग/अपंग) यांत** शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक अपंग-२००७/प्र.क्र.६११/सुधार-३, दिनांक २० एप्रिल,२००७ शासन परिपत्रक शासन प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३/भाग-३/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर,२००७ तसेच शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च,२०१० अन्वये विहीत करण्यांत आलेल्या कार्यपध्दतीनुसार विकलांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्यांची निवड करण्यांत येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यांत येईल . **हि बाब जाहिरातीतून वगळण्यांत येत आहे.**

सदस्य सहसचिव
जिल्हा निवड समिती,जळगाव तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,जळगाव

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती,जळगाव तथा
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जळगाव

सदस्य
जिल्हा निवड समिती,जळगाव तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती,जळगाव तथा
जिल्हाधिकारी ,जळगांव